Vol 1 Issue 6 Dec 2011
ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.oldgrt.lbp.world**

ISSN No-2231-5063 Vol.1,Issue.VI/Dec 2011pp.1-4

Research Paper

# नव्वद नंतरची दलित कविता

प्रा. प्रकाश कांबळे

मराठी विभाग, के.एन. भिसे महाविद्यालय, कुर्डूवाडी.

सारांश

नव्वद नंतरच्या दशकात देशाने स्विकारलेल्या उदारीकरणाच्या धोरणाने मोठ्या प्रमाणात सामाजिक स्थित्यंतरे घडून आली. दलित समाजही या स्थित्यंतरांपासून अलिप्त राहू शकला नाही. जागतिकीकरणामुळे शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही भागांतील दलित समाज विवंचनेत सापडलेला दिसतो. ग्रामीण भागातील कृषिकेंद्रीत जीवनव्यवस्था उदधवस्त झाल्याने रोजगाराच्या संधी उरलेल्या नाहीत. त्यामुळे नाईलाजाने शहराकडे स्थलांतरीत झालेल्यांच्या नशिबी कंपन्यांतील, कारखान्यामधील मजूरीच आलेली दिसते. सुशिक्षित दलित समाज जागतिकीकरणामुळे मागे खेचला गेला आहे. जागतिकीकरणामुळे जात ही संकल्पना नष्ट होईल ही आशा फोल ठरली आहे. उलट जातीय अस्मिता आज नव्याने डोके वर काढताना दिसते आहे. मूलतत्त्ववाद वाढतो आहे. गरीब–श्रीमंतामधील दरी वेगाने वृध्दिंगत होउन एक नवी चातुर्वण्यव्यवस्था निर्माण होताना दिसत आहे. अशा प्रकारचे व्यामिश्र वास्तव अलीकडच्या दशकातील दलित कवितेसमोर उभे असल्याचे जाणवते. या वास्तवाचा वेध घेण्याचा प्रयत्न नव्वद नंतरच्या काही दलित कवींनी केलेली दिसून येतो. प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून नव्वद नंतरच्या दलित कवितेविषयी ऊहापोह करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**प्रस्तावना :**

नव्वद नंतरच्या दशकातील काही दलित कवींच्या कवितांमध्ये जागतिकीकरणामुळे दलित समुहांवर झालेल्या परिणामांचे संदर्भ आढळतात. त्यामध्ये प्रामुख्याने अरुण काळे, महेंद्र भवरे, उत्तम कांबळे, लोकनाथ यशवंत, धम्मपाल रत्नाकर, रोहन नागदिवे, अविनाश गायकवाड, आदि कवींची कविता महत्त्वाची आहे. जागतिकीकरणाचा प्रभाव टिपणाऱ्या कवींची संख्या हाताच्या बोटावर मोजण्या इतपत असली तरी त्यांच्या कवितेमधील जागतिकीकरणाचे संदर्भ समाधानकारक आहेत हे नमुद करावेसे वाटते.

नव्वद नंतरची दलित कविता लिहिणारी नवी पिढी ही तीव्र सामाजिक भान जोपासणारी आहे. ही पिढी राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय पातळीवर घडणाऱ्या घडामोडी आणि त्यांचे दलित समूहांवर होणारे परिणाम यांची निरीक्षक आहे. त्यामुळेच जागतिकीकरणसारख्या बहुव्यापी प्रक्रियेच्या आगमनाचे सूचन त्यांच्या कवितांमधून आढळते. अरुण काळे त्यांच्या 'नंतर आलेले लोक' या कवितासंग्रहात लिहितात,

'खुष्कीच्या मार्गातून ।मसाल्याचा ठसका आला
पुन्हा इंडियाची डिस्कव्हरी झाली सुरु
सायराबाद अन् हैदराबाद ।सुपर मार्केट अन् पानठेला
स्पेस शटल अन् सायकलरिक्शा । हेलपाटया अन् कंटेनर्स'(नंतर आलेले लोक, पृ. 30)

भारताची पारंपारिक ओळख पुसून आधुनिक इंडियाची नव्याने डिस्कव्हरी करु पाहणाऱ्या जागतिकीकरणाच्या आगमनाचे सूचन तर काळे करतातच पण त्याचबरोबर या प्रक्रियेमुळे होणाऱ्या पारंपरिक व्यवस्थेच्या पडझडीकडे लक्ष वेधतात. यासाठीच ते सुपरमार्केट, पानठेला, स्पेस शटल, सायकलरिक्शा, हेलपाटया, कंटेनर्स अशा नव–पुरातन प्रतीकांची मांडणी करतात. जागतिकीकरण हे 'बहुजन अहिताय' आहे असे अरुण काळे यांना वाटते. या जागतिकीकरणाने फक्त उच्चभ्रूंच्याच पदरात समृध्दिचे माप टाकले आहे. दलित वर्ग मात्र आजही दारिद्र्यातच खितपत पडलेला आहे. सुधाकर गायकवाड म्हणतात, ''खरं तर, जागतिकीकरणाने दारिद्र्य नष्ट करण्याचं आश्वासन दिलं होतं पण जागतिकीकरणाने जगातील दारिद्र्य वाढविलं आहे. भारतात मुबलक अन्नधान्य आहे पण क्रयशक्तिविना दलित आदिवासी वर्गातील बालकं उपाशी मरत आहेत.''[1] जागतिकीकरणाने अशा प्रकारे सामाजिक विषमतेला खतपाणी घातलेले दिसून येते.

महानगरामध्ये रोजगारासाठी स्थलांतरित होऊन कारखाना, कंपन्यांमध्ये काबाडकष्ट करणाऱ्या दलितांच्या स्थितीचाही दलित कवी आढावा घेताना दिसतात. कारखानदारांमध्ये नफा कमविण्याची आज जीवघेणी स्पर्धा सुरु आहे. त्यामुळे कामगारांकडून दिवसरात्र कष्ट करून घेतले जात आहे. त्यांच्या स्वास्थ्याचा विचार कुणीच करताना दिसत नाही. त्यांना पुरेसा मोबदला दिला जाताना दिसत नाही. उत्तम कांबळे एका कवितेत लिहितात,

'श्रमाबरोबर सारा माणूसच ।विकत घेऊ पाहणारी दुनिया
परवा ।ती गुलाम विकत घेत होती ।काल ।भूदास विकत घेत होती
आज ।श्रमदास विकत घेत आहे' (जागतिकीकरणात माझी कविता, पृ. 112)

आधुनिकतेचा टेंभा मिरवणारी ही जागतिकीकरणाची प्रक्रिया अशा प्रकारे दलितांच्या शोषणाची सनातन परंपराच पुढे नेताना दिसते. गुलाम–भूदास–श्रमदास हा क्रम म्हणजे मागील प्रकरण पुढे चालू असाच प्रकार आहे. शोषणाची फक्त परिभाषा बदलली आहे. शोषित मात्र तेच आहेत. मजूरांच्या अतोनात शोषणाविषयी कणव व्यक्त करताना लोकनाथ यशवंत लिहितात,

'कारखानदाराच्या उत्पादक जाहिरात फलकाला
कुणी मजूर खिळा मारताना दिसला की,
मला येशू ख्रिस्ताचीच आठवण होते' (आता होऊन जाऊ द्या, पृ. 17)

येशू खिस्ताप्रमाणे संपूर्ण दलित वर्गालाच या जागतिकीकरणाने क्रुसावर चढवले आहे. चहूबाजूंनी त्यांचे शोषण सुरु आहे. लुटमार सुरु आहे. प्रसिध्द विचारवंत मोतीराम कटारे एके ठिकाणी म्हणतात, ''आधुनिक जागतिकीकरणाने गरीब आणि श्रीमंत असे दोन स्पष्ट वर्ग तयार झाले आहेत. श्रीमंत अधिक श्रीमंत तर गरीब अधिक गरीब होतो आहे''[2] धनिक लोक ऐषोआरामात जगत आहेत. सर्व सुखसुविधा त्यांच्या पायाशी लोळण घेत आहेत. आणि गरिबांना मात्र अन्न–वस्त्रासारख्या मूलभूत गरजांसाठीही प्रचंड आटापिटा करावा लागतो आहे. ही पराकोटीची विषमता जागतिकीकरणाने निर्माण केली आहे. त्याविषयी नव्वद नंतरची दलित कविता गंभीर भाष्य करताना दिसते.

जागतिकीकरणामुळे माणसे जागतिक पातळीवर एकमेकांशी बांधली गेली. मात्र सामाजिक पातळीवर एकमेकांपासून विभक्त झाली. टी.व्ही., मोबाईल, इंटरनेट यांसारखी अत्याधुनिक साधने, उपभोगवाद, चंगळवाद यामुळे माणसे आत्ममग्न झाली. माणसांना दुसऱ्या माणसांविषयी काहीच वाटेनासे झाले. प्रत्येकजण स्वतःपुरता विचार करु लागला. या बधीर सामाजिक जाणिवेमुळे सामाजिक विषमतेला नकळतपणे खतपाणी मिळत गेल्याचे दिसते. नव्वद नंतरची दलित कविता या सर्व प्रश्नांना मुळातून भिडताना दिसून येते. दलितांच्या जगण्याचे भेसूर चित्रण करताना महेंद्र भवर लिहितात,

'भूकेच्या वखवखी । आतडयात काथ्याकूट । गिरणीतील उद्रभरणाचे मातीसह पीठ'
(महासत्तेचे पीडादान पृ. 10)

दलितांच्या जगण्यासाठीचा संघर्ष खोलवर चित्रित करण्याचे कार्य महेंद्र भवरंची कविता करते. मुळातच दलित समाजामध्ये आता कुठे शिक्षणाचे महत्त्व पटण्यास सुरुवात झाली आहे. संक्रमणावस्थेत नुकताच प्रवेश करु पाहणारा हा समाज या जागतिकीकरणाच्या झंझावाताने पूर्णपणे गोंधळून गेला आहे. उच्चभ्रू आणि सधन लोक आधुनिक शिक्षण घेऊन सज्ज आहेत. त्यांच्यापुढे आपला निभाव कसा लागणार असा प्रश्न त्यांच्या मनात आहे. उत्तम कांबळे म्हणतात, ''एकजण आत्याधुनिक ज्ञान, तंत्रज्ञान घेऊन लढाईला निघालेला आहे आणि दुसरा आपल्या कपाळावर सटवीनं लिहिलेली ललाटीची भाषा समजून घेत निघाला आहे या विषम लढाईत ज्यांच्याकडे आत्याधुनिक आणि मुबलक साधने आहेत त्यांचा विजय होणार''[3] या विषम परिस्थितीमुळे आजचा दलित वर्ग प्रचंड संभ्रमित झाला आहे. त्याची ही संभ्रमित अवस्था रेखाटताना उत्तम कांबळे लिहितात.

'एक समूह । असाच चालतो आहे । परस्परांच्या । जखमा मोजतो आहे ।
परस्परांचे । हुंदके मोजतो आहे । चालायचं तर खूप आहे । पण कसं कळत नाही'
(जागतिकीकरणात माझी कविता पृ. 114)

उत्तम कांबळे यांच्या कवितेमध्ये या गोंधळाचे, असुरक्षितपणाचे अनेक संदर्भ आढळून येतात. या सर्वांमुळे दलित वर्गामध्ये न्यूनगंडाची भावनाही वाढीस लागलेली दिसते. या जीवघेण्या स्पर्धेत आपण आपल्या अस्तित्वासह उखडले जाऊ ही भीती दलितांना अस्वस्थ करते आहे. त्याचे अस्वस्थ करणारे चित्रण अनेक नव्वदोत्तर दलित कवींच्या कवितेतून आविष्कृत होताना दिसते.

एकूणच नव्वद नंतरच्या दलित कवितेचे निरीक्षण केल्यानंतर आपल्या हाती काही निष्कर्ष येतात, ते पुढीलप्रमाणे..... 1) नव्वदोत्तर कालखंडात जागतिकीकरणाने उभा केलेल्या अनेक समस्यांना अंतःस्तरापर्यंत प्रतिबिंबित करण्याचे कार्य दलित कविता करते. 2) जागतिकीकरणाला सामोरे जाताना दलित समुहाची झालेली संभ्रमावस्थाही दलित कवितेमधून प्रकटते. दलितांच्या मनात निर्माण झालेली असुरक्षिततेची भावनाही काही कवितांमधून स्पष्टपणे दिसते. 3) नव्या स्वरुपात उगवू पाहणाऱ्या जातीयवादाचे चित्रणही दलित कवितेमध्ये आढळते. एकीकडे जागतिकीकरणामुळे होऊ लागलेले एकारलेपण आणि दुसऱ्या बाजूला वाढता मूलतत्त्ववाद ही पराकोटीची विसंगती कवींना अस्वस्थ करते. दलितांवरील परिणामांची अधिक सखोल आणि साधक–बाधक चिकित्सा करणारी कविता नव्वद नंतरच्या कालखंडात आविष्कृत झालेली दिसते.

***संदर्भ :***

(1) गायकवाड सुधाकर, पुन्हा चाल करु या, कवी लोकनाथ यशवंत, यंग इंडिया पब्लिकेशन्स, मुंबई, प.आ. 2009, पृ. 16
(2) कटारे मोतीराम, जागतिकीकरण आणि मराठी साहित्य, संपा. शरद गायकवाड आणि सुनिल शिंदे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प.आ. 2009, पृ. 157
(3) कांबळे उत्तम, जागतिकीकरण आणि दलितांचे प्रश्न, सुगावा प्रकाशन, पुणे, प.आ., 2002, पृ. 35

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.oldgrt.lbp.world